# National Service Scheme Department Sanction Letter of Savitribai Phule Pune University On Academic Year 2015-2016

SF-9


डॉ. संजयकुमार दळवी
एम.एससी.,पीएच.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक


## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### राष्ट्रीय सेवा योजना


गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०-२५६९६३४६
०२०-२५६०१३५८
फॅक्स क्र. : ०२०-२५६९६३४९
मोबाईल : ९६५००१४४५५


दि. ०८/०९/२०१५

संदर्भ : रासेयो/५९४/२०१५

प्रति
मा. प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी
अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे
श्री मुलिकादेवी महाविद्यालय
निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर

**विषय : सन २०१५–२०१६ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाह एकक मंजूरीबाबत...**

ा. महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात आनंद होतो की, राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१५–१६ साठी आपल्या महाविद्यालयास आपल्या मागणीनुसार विद्यार्थी स्वयंसेवक १०० (अक्षरी–शंभर) संख्येचे **स्वयंनिर्वाह एकक** मंजूर करण्यात येत आहे. स्वयंनिर्वाह एककाअंतर्गत नियमित कार्यक्रम व विशेष शिबीराचे आयोजन करणे अनिवार्य राहील. स्वयंनिर्वाह एककाचा स्वतंत्र हिशोब रासेयो कार्यालयाला दि. ३० मार्च २०१६ पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. या संदर्भातील सर्व प्रकारच्या कागदपत्रांवर स्वयंनिर्वाह एकक असा स्पष्ट उल्लेख असावा. स्वयंनिर्वाह एकका संदर्भातील सर्वप्रकारची कागदपत्रे स्वतंत्र ठेवण्यात यावीत (मान्यता पत्र, शिबीर प्रस्ताव, विद्यार्थी यादी, धनाकर्ष).

याकरीता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत कोणत्याही प्रकारचे अनुदान आपल्या महाविद्यालयास अदा करण्यात येणार नाही, कृपया याची नोंद घेण्यात यावी.

१. महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे SC-11.8%, ST-9.4% व Other-78.8% यानुसार स्वयंसेवकांचे प्रवेश करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे विशेष विद्यार्थी (उदा. अंध, अपंग इ.) यांच्या प्रवेशासाठी विशेष प्रयत्न करावेत.
२. महाविद्यालयाने रासेयो मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेशित करुन घेवू नये. अतिरीक्त विद्यार्थी संख्येची संपूर्ण जबाबदारी संबधित महाविद्यालयाची राहील.
३. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत निवड केलेल्या स्वयंसेवकांच्या नावांची (अल्फाबेटीकल) वर्गनिहाय व प्रवर्गानुसार (SC, ST, OTHER) प्रमाणे यादी रासेयो कार्यालयास धनाकर्षासोबत जमा करावी. (यादी पाठविल्यानंतर त्यात कुठल्याही परिस्थितीत बदल करू नये.)
४. रु.१०/–प्रमाणे (प्रति विद्यार्थी) x विद्यार्थी संख्या 'मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे' यांचे नावे धनाकर्ष काढून तसेच नियमित राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेषा व विद्यार्थी यादी दि. ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंत रासेयो कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.
५. महाविद्यालयास स्वतंत्र पत्रव्यवहार न करता उपक्रमांसंदर्भात (www.unipune.ac.in/nss) या एन.एस.एस. वेबसाईटवर वेळोवेळी परिपत्रक टाकण्यात येतील. तसेच एस.एम.एस. (sms) द्वारे कळविण्यात येईल. त्यानुसार महाविद्यालयांनी कार्यक्रम राबवावेत व अहवाल, छायाचित्र रासेयो कार्यालयास सादर करावे, ही विनंती.

कळावे, धन्यवाद !

प्र. कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

amsung Triple Camera